# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 115/2023 दिनांक : 18.03.2023**

## 1)जबरी चोरी :—

**शिवाजीनगर :—**दिनांक 14.03.2023 रोजी सकाळी 08.30 वा. चे सुमारास, **महात्माफुले शाळे मागे रेस्ट हॉउस जवळ. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा तिचे आई श्रीनगर येथे स्कुटीवर सोडुन परत यंशवंत कॉलेज कडे रेस्ट हॉऊस मार्गे कॉलेजकडे जात असतांना दोन अनोळखी इसमांनी स्पेंलडर मोसा वर पाठीमागुन येऊन स्कुटी थांबवुन खंजरचा धाक दाखवुन पैसे काढ असे म्हणुन थापडा बुक्याने मारहान करून खिशातील ओपो कंपनीचा मोबाईल किंमती 14,500/—रूपयेचा जबरीने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी गणेश अनुरत लुंगारे, वय 24 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा.मु.पो. पानभोसी ता.कंधार ह.मु जैनमंदिर वजिराबाद जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 82/2023 कलम 394, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री माने, मो.क्रं. 9403546846** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :—

**उमरी :—**दिनांक 17.03.2023 चे 00.00 ते 05.00 वा. चे दरम्यान, **मौ. गोरठा ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या घराचे कुलूप तोडुन घरात आत प्रवेश करून फिर्यादीचे पत्नीने तुरीच्या डाळीच्या डब्यात ठेवलेले सोन्या चांदीचे दागीने किंमती 70,000/—रूपयाचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी साहेबराव पोतलाजी कमळे, वय 37 वर्षे, व्यवसाय शेती रा. गोरठा ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरन 61/2023 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/1017 केंद्रे, मो.क्रं 8888807597** हे करीत आहेत.

## 3)हायवा टिपर चोरी :—

**नांदेड ग्रामीण :—** दिनांक 13.03.2023 रोजी चे सायंकाळी 06.00 वा. ते दि. 17.03.2023 चे 08.30 वा. चे दरम्यान, **मौ. गुंडेगाव पेट्रोलपंपासमोर उस्माननगर, रोड ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हायवा कंपनीचे टिपर क्रमांक एमएच—26/एबी—5012 किंमती 12,00,000/—रूपयाचा नमुद ठिकाणी लावला असता कोणीतरी अज्ञात आरोपीतांनी चोरून नेला आहे. वगैरे **फिर्यादी विकास मोहनराव आढाव, वय 38 वर्षे, व्यवसाय मटेरियल सपलायर, रा. विकासनगर जुना कौठा ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 180/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री भालेराव, मो. क्रं. 9637355836** हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :—

**1)बिलोली :—** दिनांक 16.03.2023 रोजी चे 22.30 वा. चे सुमारास, **मौ. गंजगाव ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा झोपलेला असतांना आरोपीने फिर्यादीस झोपेतुन उठून तुझे हिश्याची शेती मला वाटुन का देत नाहीस म्हणुन लाकडाने डाव्या हाताचे मनगटावर व कुऱ्हाडीने डोक्यात व डावे हातावर मारून गंभीर दुखापत केली. तसेच यातील आरोपीने साक्षीदार दत्तराम यांच्या घरास आग लावुन जाळुन अंदाजे 14 लाख रूपयाचे नुकसान केले. वगैरे **फिर्यादी मोहन पी पिराजी बावलगावे, वय 65 वर्षे, व्यवसाय शेती रा. गंजगाव ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 37/2023 कलम 326, 436, 323, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2049 आंबेवार, मो.क्रं. 7721005064** हे करीत आहेत.

**2)लोहा :—** दिनांक 16.03.2023 रोजी चे 22.00 वा. चे सुमारास, **नगरपरिषद लोहा समोरील राजु अंबुर्डे यांचे न्यु साई हॉटेल लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीस आरोपीने पलंगावरून का झोपलास उठ असे आरोपीने फिर्यादीस मला पलंगावर झोपायचे आहे म्हणाला असता. तेव्हा फिर्यादी हा पलंगावरून उठण्यास नकार दिल्याने आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करून थापडा बुक्याने मारहाण केली. तेव्हा फिर्यादी हा आरोपीस समजावुन सांगत असताना आरोपी हा कांही एक न ऐकता त्याने लाकडाने फिर्यादीच्या डाव्या हाताच्या दंडावर तसेच मनगटावर मारहाण करून फॅक्चर करून गंभीर दुखापत केली. वगैरे **फिर्यादी अमर मेहेबुब लदाफ, वय 26 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. कलाल पेठ जुना लोहा ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 58/2023 कलम 326, 323, 504, 506, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री तांबे, मो.क्रं. 9850188100** हे करीत आहेत.

## 5)विवाहीतेचा छळ :—

**1)नांदेड ग्रामीण :—** दिनांक में 2021 ते दिनांक 14.02.2023 पावेतोचे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी उस्मानाबाद व माहेरी कल्हाळ ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस ॲटो घेण्यासाठी तुझ्या माहेरूहुन दोन लाख रूपये घेवून ये म्हणुन फिर्यादीचा शारिरीक व माणसीक छळ केला तसेच शिवीगाळ करून मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली.. वगैरे **फिर्यादी 22 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 181/2023 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2442 नलबे, मो.क्रं. 9823232815** हे करीत आहेत.

**2)विमानतळ :–** दिनांक 05.03.2023 रोजी ते आज पावेतो, **सप्तीश्रृंगी शांती सागर पोलीस सोसायटी रमाबाई घाटकोपर मुंबई, ह.मु. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस प्लॉट घेण्यासाठी तुझ्या माहेरूहुन पाच लाख रूपये घेवून ये म्हणुन फिर्यादीचा शारिरीक व माणसीक छळ केला तसेच शिवीगाळ करून मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली.. वगैरे **फिर्यादी 24 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 97/2023 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2735 कंधारे, मो.क्रं. 9561045306** हे करीत आहेत.

**3)उमरी :–** दिनांक 01.01.2019 रोजी पासुन ते दिनांक 17.03.2023 रोजी चे दरम्यान, **मौजे नरसी ता. नायगाव जि. नांदेड ह.मु. गोळेगाव ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस लग्नात झालेला खर्च आणून दे म्हणुन दोन लाख रूपयांची मागणी करून तसेच तु दिसायला चांगली नाहीस मी तुला सोडुन देतो असे म्हणुन फिर्यादीचा शारिरीक व माणसीक छळ केला तसेच शिवीगाळ केली. वगैरे **फिर्यादी 25 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 60/2023 कलम 498(अ),323,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1670 जाधव, मो.क्रं. 8888807597** हे करीत आहेत.

## 6)फसवणुक :–

**तामसा :–** दिनांक 03.02.2023 ते दिनांक 20.02.2023 चे दरम्यान, **मौ. तामसा ता. तामसा जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात आरोपीने जनता ट्रॅव्हल्स या नावाने कंपनी अबुधाबी दुबई येथून इतिहात एअरवेज कंपनीमध्ये तुमचे सलेक्शन झाले म्हणुन नमुद ता. वेळी पर्यंत पैशाची मागणी केल्याने यातील फियादीने त्यांचे मोबाईल वरून फोन पे व्दारे 1,47,050/–रूपये पाठवले व नंतर सदर आरोपीस फोन केला असता त्याने त्याचा मोबाईल बंद करून ठेवल्याने फसवणुक झाल्याचे फिर्यादीचे लक्षात आले. वगैरे **फिर्यादी अशफक नासेर खॉन पठाण, वय 32 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. तामसा ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे तामसा** गुरन 19/2023 कलम 420 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री किरवले, मो.नं. 9922101100** हे करीत आहेत.

## 7)शासकीय आदेशाचे उल्लंघन :–

**मुदखेड :–**दिनांक 17.03.2023 रोजी 16.00 वा. ते 20.00 वा. चे दरम्यान, **मुदखेड शहर ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद दहा आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या ट्रॅक्टर क्रमांक एम.एच.–26/क्यु–480 वर साऊंड सिस्टिम लावून मिरवणूक काढुन कालेजी मंदिर ते मोढा मैदान दरम्यान साऊंड वाजवून मोठयाने आवाज करून आरडा ओरड करीत मा. जिल्हाधिकारी साहेब नांदेड यांचे जमावबंदी व शासकीय आदेशाचे उल्लंघन केले आहे. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2189 किशोर दत्तात्रेय पाटील, ने. पोस्टे मुदखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 49/2023 कलम 188 भादवी सह कलम 134,135,136 मु. पो. का. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री गिते, मो.क्रं. 8329115398** हे करीत आहेत.

## 8)अपघात :–

**विमानतळ :–** दिनांक 14.03.2023 रोजी 03.30 वा. चे सुमारास, **म्हशीचे बाजार जवळील डिवायडर कामठा, नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे पती **मयत नामे सिदधार्थ विश्वनाथ कोकरे, व्यवसाय अॅटो चालक रा. पंकजनगर धनेगाव, नांदेड** यांनी आपले स्वतः चे ताब्यातील अॅटो क्रं एमएच–26/बीडी–1687 च्या चालकाने आपला अॅटो वाहन हयगय व निष्काळजी पणाणे भरधाव वेगात चालवुन अॅटो डिवायडरवर आदळुन पलटी करून स्वतः चे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी किरणबाई सिध्दार्थ कोकरे, वय 37 वर्षे, व्यवसाय गृहणी रा. पंकजनगर, धनेगाव, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं. 96/2023 कलम 279, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री पठाण मो. नं. 8638361977,** हे करीत आहेत.

## 9)जुगार :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 17.03.2023 रोजी 15.30 वा. चे सुमारास, **आलु प्याज मार्केट रोडवर सय्यद उस्मान रहेमान साब यांचे हॉटेलच्या बाजुस असलेल्या मोकळया जागेत, नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशीररीत्या टाईम बाजार नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 1495/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/492 संतोष रघुनाथ जाधव, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 183/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/273 केंद्रे, मो.क्रं. 9011327435** हे करीत आहेत.

## 10)विषारी औषध पिऊन आत्महत्या :–

**हिमायतनगर :–**दिनांक 09.03.2023 रोजी 05.00 वा. चे सुमारास, **व्हिजन हॉस्पीटल, नांदेड येथे,** यातील **मयत नामे प्रभाकर दादाराव कदम वय 40 वर्षे, व्यवसाय शेती रा. कवठा ता. हिमायतनगर जि. नांदेड,** यांनी सततचे नापीकीला व बँकेचे कर्ज कसे फेडावे व म्हणुन कोणतेतरी विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार ऋतिक प्रल्हाद कदम, वय 23 वर्षे, रा. कवठा ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे हिमायतनगर** आ. मृ. **08**/2023 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मसपोउपनि/श्री कांगणे, मो.नं. 9923623333** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड